**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०४ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

- **जीएसटी करसुधारणांचं विविध मान्यवरांकडून स्वागत/ उद्योग जगताने व्यक्त केला आनंद.**
- **ओबीसी महासंघातर्फे नागपुरात सुरू असलेले साखळी उपोषण आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांचा उपस्थितीत मागे.**
- **गडचिरोलीतील नागरिकांना आता 'स्पेक्स २०३०'उपक्रमाद्वारे नेत्रसेवा मिळणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**
- **नागपूरच्या सोलार एक्सप्लोजिव या शस्त्रास्त्र निर्मितीमध्ये कार्यरत असणाऱ्या कंपनीत मध्यरात्री स्फोट, एका कामगाराचा मृत्यू, अनेक जखमी.**

**वस्तु आणि सेवा कर**

जीएसटी कररचनेतल्या सुधारणांचं सर्व क्षेत्रातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या सुधारणांचं कौतुक केलं आहे. जीएसटीचे दर कमी करण्याच्या सरकारच्या या निर्णयामुळे सर्वांना फायदेशीर होणार आहे. जीवनमान सुलभ करण्यासाठी दरांचं सुसूत्रीकरण आणि सुधारणांसाठी एक सविस्तर प्रस्तावही तयार केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी जीएसटीमधला बदल जीवन सुलभ आणि व्यवसाय सुलभ करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांवर मोठा प्रभाव टाकेल. अशी प्रतिक्रिया आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. तर जीएसटीमधली सुधारणा ही एक परिवर्तनकारी पाऊल असून शेतकरी, एमएसएमई, महिला, तरुण, मध्यमवर्गीय या सर्वांनाच दिलासादायक असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. जीएसटी सुधारणांमध्ये कर्करोग आणि दुर्मीळ आजारांच्या उपचारांसह ३६ जीवनरक्षक औषधांवरचा जीएसटी शून्य टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचा आरोग्यसेवेवरचा खर्च कमी होईल आणि जीवनमान सुधारेल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी दिली आहे. जीएसटी कररचनेतल्या सुधारणेमुळे देशातल्या प्रत्येक कुटुंबाला मदत होणार असल्याची प्रतिक्रिया माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली....

***हमारे मध्यम वर्ग के परिवारों के जीवन में काम में आने वाली हर चीज़ चाहे खाने से संबंधित हो, चाहे पहननेसे से संबंधित हो, चाहे बच्चों की पढ़ाई से संबंधित हो तो हर चीज़ पर जीएसटी की दरे एक बड़ी मात्रा में कम की गई है जिससे हमारे मध्यम वर्ग परिवारों के जीवन में, एक बड़ी खुशी की लहर है।***

या सुधारणा म्हणजे करव्यवस्थेतलं एक धाडसी पाऊल असून, यामुळे मागणीला चालना मिळेल, तसंच संबंधित प्रक्रिया सोप्या करतील, अशी प्रतिक्रिया फिक्कीचे माजी अध्यक्ष शुभ्रकांत पांडा यांनी दिली आहे. लहान व्यापारी, ग्राहकांसह भारताच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होणार असल्याचं ऑल इंडिया ट्रेडर्स कॉन्फेडरेशने म्हटलं असून, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

**'जीएसटी कर सुधारणा'**

वस्तू आणि सेवा कररचनेच्या सुसूत्रीकरणाला काल वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५६व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरात जीएसटी कर आकारणी होईल असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. ही सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू केली जाईल. वैयक्तिक विमा, सावधी विमा, युलीप अथवा एन्डोवमेंट पॉलिसी, कौटुंबिक, ज्येष्ठ नागरिकांचा विमा तसंच पुनर्विमा यांसह सर्व वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी यांना वस्तू आणि सेवा करातून सवलत देण्यात आली आहे. सामान्य माणसाला परवडणारा विमा मिळणं आणि विम्याची व्याप्ती वाढवण्याचा उद्देशानं हे बदल केल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. जीएसटी बदलामध्ये ३३ जीवरक्षक औषधांवरील कर १२ टक्क्यांवरून शून्य तर कर्करोग, दुर्मिळ आजार आणि इतर गंभीर आजारांवर वापरल्या जाणाऱ्या तीन जीवरक्षक औषधांवरील जीएसटी ५ टक्क्यांवरून शून्य करण्याची घोषणा केली आहे. इतर सर्व औषधांवरील कर १२ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. तर वैद्यकीय शस्त्रक्रिया, दंतोपचार, पशुवैद्यकीय हेतूंसाठी वापरल्या जाणारी वैद्यकीय उपकरणं आणि साधनं यांच्यावरचा कर १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. त्याशिवाय केसांना लावायचं तेल, साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश, सायकल, स्वयंपाकाची भांडी, आदी घरगुती वापराच्या वस्तूवर ५ टक्के जीएसटी असेल. सामान्य मध्यमवर्गाला दिलासा देणारे अन्य महत्त्वपूर्ण निर्णय देखील कालच्या बैठकीत घेण्यात आले. त्यानुसार वातानुकुलित यंत्र, दूरचित्रवाणी संच, डिशवॉशर, लहान चारचाकी, मोटारसायकल यांच्यावरचा २८ टक्के जीएसटी कमी करून तो १८ टक्के करण्यात आला. सीमेंट आणि तीनचाकी वाहनांवरील करही २८ टक्क्यावरून १८ टक्के करण्यात आला आहे. अप्रत्यक्ष कर रचनेतील १२ टक्के आणि २८ टक्के दर रद्द करून, ५ टक्के आणि १८ टक्के करण्यात आले तसंच सध्याचे चार टप्पे कमी करून दोनवर आणण्यात आले आहेत. पानमसाला, तंबाखू उत्पादन, सिगारेट तसंच साखरयुक्त पेयांवर ४० टक्के विशेष जीएसटी दर आकारला जाईल. तसंच बाराशे सीसी पेट्रोल आणि पंधराशे सीसीपेक्षा अधिक क्षमतेच्या डिझेल कारवर ४० टक्के कर लावला जाईल. त्यामुळे या वस्तू महागणार आहेत.

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

रस्त्यावर चालकांचा थकवा आणि तंद्रीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी, योग्य ऑपरेशनल मानकांसह झोप आणि थकवा शोधणारी उपकरणे लागू केली आहेत. आम्ही बस बॉडी कोड देखील अनिवार्य केला आहे, तो जागतिक मानकांशी जुळवून घेत, अपघात झाल्यास जीव वाचतील याची खात्री करतो अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे -

***यह जो कभी-कभी नींद आ जाती है, फटिग एंड स्लीप डिटेक्शन डिवाइस उसके लिए हमने प्रिपरेशन की है. उसका भी स्टैंडर्ड फॉर ड्राइवर ड्राउजनेस डिटेक्शन और अलर्ट सिस्टम को भी अभी इसमें लिया है, जो बस बॉडी हथोड़ा लेकर कुछ भी बनाते थे. मैंने बहुत दिनों तक उनको सुधारने की कोशिश की, हम करेंगे करेंगे पर वह नही सुधारने पर, आखिर हमने बस बॉडी को अब मैंडेटरी कर दिया है फर्स्ट स्टैंडर्ड का, जिसके कारण बस क्रैश होने के बाद लोगों की जान बचा जा सके.***

**इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे**

मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करू नये आणि सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. या प्रमुख मागणीसह विविध एकुण 14 मागण्यांसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ तर्फे नागपुरात गेल्या 30 ऑगस्ट पासून सुरू असलेले साखळी उपोषण आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांचा प्रमुख उपस्थितीत संपविण्यात आले. यावेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे यांनी मंत्री अतुल सावे यांना ओबीसी समाजाचा कल्याणासाठी प्रलंबित असलेल्या विविध 14 प्रमुख मागण्या केल्या. या 14 मागणीपैकी 12 मागण्या इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी तात्काळ मंजूर करीत त्यासंदर्भात 1 महिन्याच्या आत GR काढण्याची घोषणा केली.

**"स्पेक्स २०३०"**

“गडचिरोलीसारख्या आदिवासी व मागास जिल्ह्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती व उपचार पोहोचवणे ही काळाची गरज आहे. तेथील नागरिकांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा मिळाल्या पाहिजे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या "स्पेक्स २०३०" या प्रकल्पामुळे मुलांचे शिक्षण, तरुणांचे रोजगार व संपूर्ण समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल,” असे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात राबविण्यात यावा, असे आवाहन केले. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुका आता डोळ्यांच्या बाबतीत आरोग्यसेवेच्या दृष्टीने देशभरात आदर्श ठरणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा ‘स्पेक्स २०३०- वन साईट कार्यक्रम” राज्य सरकारच्या आरोग्य विभाग आणि वन साईट एसीलॉर लक्सोटिका फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गडचिरोलीसह देशातील पाच मागास जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे.

**सोलार एक्सप्लोजिव**

नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावर स्थित बाजारगाव कोंढाळी इथल्या सोलार एक्सप्लोजिव या शस्त्रास्त्र निर्मितीमध्ये कार्यरत असणाऱ्या कंपनीत मध्यरात्री स्फोट झाला. यामध्ये १६ कामगार जखमी झाले. जखमींना उपचारासाठी नागपूर इथल्या एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. दरम्यान एका व्यक्तीचा मृत्यू झाल्या बद्दल कंपनीतर्फे कळविण्यात आलं असून, मृताच्या कुटुंबियांप्रति त्यांनी सहवेदना व्यक्त केली आहे.

**अनंत चतुर्दशी सज्जता**

गणेशोत्सवाच्या निमित्तानंसंपूर्ण राज्यभरात उत्साहाचं वातावरण पाहायला मिळत आहे. दहा दिवसांच्या या चैतन्य पर्वाची अनंत चतुर्दशीला, शनिवारी सांगता होणार आहे. यासाठी ठिकठीकाणच्या पोलीस आणि स्थानिक प्रशासनानं तयारी केली आहे. मूर्ती विसर्जनाऐवजी, त्या संकलित करण्याचं आवाहन करण्यात आलं असून, त्यासाठी ठिकठिकाणी संकलन केंद्र उभारण्यात येणार आहेत.

**हवामान**

विदर्भातील भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यात काही तुरळक ठिकाणी पावसाची हलक्या सारी कोसळण्याची नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.